# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/12/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील साई डेअरी फॉर्मींग, मौजा टेकाडी कन्हान येथे दिनांक ०३/१२/२०२३ चे १६.०० वा. ते १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– नरेश कचरूजी गर्वे, वय ५४ वर्ष, रा. इंदिरानगर कन्हान हे दि. ०३/१२/२०२३ रोजी ०४.०० वा. फॉर्म हाउसवर जावुन तिथे काम करणारे सर्व मजुरांचे पैसे वाटप करून आपले फॉर्म हाउसवर बेडरूममध्ये आराम करण्यास गेले व पॅट काढुन हॅगरला अटकवुन फिर्यादीच्या पॅटच्या समोरील खिशात अंदाजे १५०००/– रू. ठेवलेले होते व फिर्यादी थकल्यामुळे झोपले असता व नंतर झोपुन उठल्यावर पॅट घातला व खिशात हात टाकुन पाहीले असता खिशातील १५०००/– रू. मिळुन आले नाही. त्याबददल शोध घेतला असता फॉर्म हाउसवर काम करणारा १) गोपाल बोमचेर वय ५० वर्ष त्याची पत्नी व मुलगी तिन्ही रा. ग्रॅम खैरलांजी पो.स्ट नामेगाव कटंगी मध्यप्रदेश हे रूमकडे फिर्यादी झोपलेला असताना आलेले होते व घाईघाईने कोणालाही न सांगता फॉर्म हाउस मधुन निघुन गेले. त्यामुळे फिर्यादीच्या खिशातुन चोरी गेलेले पैसे हे गोपाल बोमचेर त्याची पत्नी व मुलगी यांनी चोरल्याचा फिर्यादीस संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३८१, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक कुंभरे ब. नं. ८६१ मो. क्र. ८२०८६१४८६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा तामसवाडी शिवार येथे दिनांक १०/१२/२०२३ चे १९.०० वा. ते ११/१२/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– अंकीत पुरूषोत्तम सायने, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ तामसवाडी ता. पारशिवनी यांचे शेतातील कुलुप नसलेल्या लाकडी ताटयाचा झोपडीतुन कोणीतरी अज्ञात चोराने स्वत:चे आर्थिक फायदया करीता अंदाजे १०० किलो कापुस तसेच फिर्यादिचे बाजुचे शेतमालक नामे– अमोल नागोराव लोखंडे रा. तामसवाडी यांचे शेतातुन अंदाजे ७० किलो कापुस किंमती ११,९००/– रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. रामराव पवार पो.स्टे. पारशिवनी मो. नं. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

## विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. मौदा :– दिनांक ११/१२/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान आरोपी नामे– **महेंद्र सुरेश आंबीलढुके रा. दहेगाव ता. मौदा** हा फिर्यादीचे घराच्या आत प्रवेश करून फिर्यादीस अश्लिल इशारे करून जवळ बोलावत होता फिर्यादी घाबरून बाहेर जाण्याचा प्रयत्न करत असता आरोपी आडवा झाला फिर्यादीने आरडा ओरडा केले असुन आजुबाजुचे लोक आले व आरोपीस घराबाहेर काढले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मॅडम मो. क्र. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## विनयभंग

१) पो.स्टे. देवलापार :– दिनांक ११/१२/२०२३ चे ०१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी वय ९ वर्ष हि रात्री आपले घरी स्वयंपाक खोलीच्या बाजुच्या रूम मध्ये दुसऱ्या बाजेवर एकटी झोपली असता ती झोपलेल्या खोलीचा दरवाजा तुटलेला असल्याने त्याला टेकून ठेवल्याने खोलीच्या दरवाज्याचे चौकटीला परदा लावून फिर्यादी व तिची पिडीत मुलगी झोपली असता रात्री ०१.३० वा. दरम्यान गावातच राहणारा आरोपी नामे –करीम वल्द मोईन खान, वय अंदाजे ३५ वर्ष, रा. करवाई ता. रामटेक हा घरात शिरुन बाजीवर झोपलेल्या पिडीताचे बाजुला झोपून तिचे तोंड दाबुन उजव्या पायावर पाय ठेवून दाबून झोपला असता पिडीताने मम्मी मम्मी असा ओरडण्याचा आवाज केल्याने फिर्यादी उठली असता आरोपीने फिर्यादीचा हात पकडून तुझे देख लुंगा असे म्हणून तेथून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४अ, ४५२, ५०६ भादवी सहकलम ८, ९ (एम) (पी) (के), १२ बालकांचे लैंगीक अपराध संरक्षण अधिनियम सहकलम ३(२) (व्हीए) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सा. रामटेक विभाग रामटेक हे करीत आहे.

२) पो.स्टे. कन्हान :– दिनांक ०९/१२/२०२३ चे १८.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व फिर्यादीची आई भाजीपाला घेवुन अशोक नगर येथून मधल्या सिमेंटच्या रस्त्याने घरी जात असता त्या ठिकाणी अंधार असल्याने फिर्यादी ही रोडवर थांबली व फिर्यादीची आई अंधारात लघवी करायला गेली असता फिर्यादीच्या पाठी मागून टु व्हीलरने पाठलाग करत दोन मूले आली त्यांनी आपली गाडी थांबवून त्यातील मागच्या सिटवर बसलेल्या आरोपी नामे– चंब्रूलाल धुर्वे याने फिर्यादीचा हात धरला व फिर्यादीला गाडीवर बस म्हणत होता ती नाही म्हणून ओरडल्याने फिर्यादीची आई तिथे आल्याने आरोपी गाडीने पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४अ, ३५४ ड भादंवि. सहकलम १२ बालकांचे लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सिमा बेंद्रे पोस्टे कन्हान मो. क्र. ७५८८७१७९०१ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**